# प्रेस नोट

## दिनांक १६/०१/२०२२ (रविवार)

## आईनेच केला अल्पवयीन मुलाचा खुन

**पोलीस स्टेशन रामटेक** :– अंतर्गत मौजा बनपूरी १५ किमी. यांतील फिर्यादी नामे– मंगेश गुधवंतराव धावडे वय २७ वर्ष रा बनपुरी ता पारशिवनी जि नागपूर व आरोपी नामे – सौ प्रणाली घावडे वय २२ वर्ष रा बनपुरी ता पारशिवनी यांचे दिनांक १४.०१.२२ चे १३.०० ते १६.०० वा दरम्यान राहते घरी किरकोळ वाद झाल्याचे कारणावरून तिचा मुलगा वेदांत घावडे वय १ वर्ष याला जिवे मारण्याचे उद्देशाने किटकनाशक औषध पाजले त्यामुळे तो मरण पावला व आरोपीने स्वत: किटकनाशक औषध पिवुन मरण्याचा प्रयत्न केला. सदर आरोपी महीला हीचा योगीराज हॉस्पीटल रामटेक येथे उपचार सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोस्टे रामटेक येथे आरोपीविरूध्द कलम ३०२,३०९ भादवि कायद्यान्वयें गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री प्रमोद मकेश्वर पोलीस स्टेशन रामटेक मो. क्र ९०४९९६५०१४ हे करीत आहेत.

## जनावर चोरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :– अंतर्गत मौजा जुनापाणी ९ किमी प. यांतील फिर्यादी नामे– प्रफुल रामचंद्र टोपले वय २६ वर्ष रा जुनापाणी तह काटोल जि नागपुर यांचे घरासमोर अंगणात बांधलेला एक पांढ–या रंगाचा बैल अंदाजे किंमती १८,०००/– रू चा दिनांक १५.०१.२२ चे ०१.३० ते ०४.३० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने बैलाची बांधलेली दोरी कापुन चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोस्टे कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि चा गुन्हा नोंद असुन तपासात आहे. अज्ञात आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिलीप इंगळे पोलीस स्टेशन कोंढाळी मो. क्र ९९२२३१४४४२ हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन खापरखेडा :–** अंतर्गत पोलीस स्टेशन समोर यातील फिर्यादी नामे– शुभम जनार्धन खंडाते वय २३ वर्ष रा सोनेगाव ता पारशिवनी व त्याचा भाउ अतुल जनार्दन खंडाते तसेच त्याचा मामा सुकरू उईके असे मिळुन दिनांक १४.०१.२२ चे १९.३० वा दरम्यान मोटर सायकल क्र एम एच ४० बिव्ही ९८०२ ने ट्रिपल सिट बसुन सोनेगाव पारशिवनी कडुन खापरखेडा येथे जात असतांना पो. स्टे खापरखेडा च्या समोर, समोरून येणाऱ्या पल्सर मो.सा. क्र. एमएच–४० बीडी–२२१७ चा चालकाने आपले ताब्यातील मो.सा. ओवरटेक करण्याच्या नादात विरूदध (रॉग) साईडने,भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून यातील मो.सा.क्र. **एमएच–४०बीव्ही–९८०२ ला जोरदार धडक देवून मोटर सायकल.क्र. एमएच–४० बीव्ही–९८०२ चालक अतूल खंडाते याचे मरणास** व **मागे बसलेल्या फिर्यादी शुभम, फिर्यादीच्या मामा सुकरू उईके** याचे गंभीर दुखापतीस कारणीभूत झाला. तसेच यातील **पल्सर चालक अतुल जनार्धन खंडाते वय २१ वर्ष रा सोनेगाव स्वत:चे मरणास** व त्याचे मागे बसलेल्या व्यक्तीच्या दुखापतीस कारणीभूत झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपीविरूध्द कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवि सहकलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री अभिषेक अंधारे पोलीस स्टेशन खापरखेडा मो. क्र ९८२३१५०१३४ हे करीत आहेत.

## अवैधरित्या जनावरांना वाहुन नेणा—या आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन देवलापार** :— अंतर्गत देवलापार गौरक्षण केंद्रसमोर निमटोला चौक ०१ कीमी उत्तर दिनांक १५/०१/२२ चे ०५/१५ वा.ते ०५/४५ वा यातील फिर्यादी पो स्टे बॅरीकेटींग लावुन मिळालेल्या माहीती अन्वये अवैध्य जनावराचे वाहतुक करणा—या ट्रक ला रोखने कामी नाकाबंदी करीत असताना यातील आरोपीतांनी आपले ताब्यातील कंटेनर ट्रक क्र. एम एच ४० बी जी ९५७८ ला नाकाबंदीच्या ठीकाणी न थांबवीता बॅरिकेट उडवुन समोर पळुन जात असताना स्टॉफने पाठलाग करून आपले शासकीय वाहन ट्रकच्या पुढे करून ट्रक थांबवीले असता यातील आरोपी नामे— **१) मुस्तकीन फिरोज खान वय २४ वर्श रा. पुराणा भुईपुरा कामठी २) भालमान भाहीद भान वय २७ वर्ष रा. बरघाट जि. सिवनी मध्यप्रदेश** यांनी यातील फिर्यादी व स्टॉफला धक्काभुक्की करून पळुन डीव्हायडर च्या दुस—या बाजुला पळुन गेले. सदर आरोपीचा फिर्यादीने पाठलाग केला असता, यातील आरोपी क्र २ याने हातात दगड घेवुन फिर्यादीचे दिशेने फेकला तेव्हा फिर्यादीने दगड चुकवुन आरोपीचे पाठलाग करून आरोपीस पकडुन वाहणाची तपासनी केली असता कंटेनर मध्ये आकुड दोरखंडाने गोवांचे तोंड मान ,पाय अंत्यत क्रुरतेने व निर्दयतेने बांधलेले ३८ गोवंश (३१ गाय व .७ बैल ) प्रत्येकी किमंती १०,०००/— रू. प्रमाणे .एकुण किमती ३,८०,०००/— रू व एक लाल रंगाचा कंटेनर ट्रक क्र एम एच ४० बी जी ९५७८ एकुन किमती १०,००,०००/—रू .आणि जनावरांना निर्दयतेने बांधण्यासाठी वापरण्यात आलेला दोरखंड आणि लाकडी पाट्या किमती २०००/— रू. असा **एकुन १३,८२,०००/—रू.** चा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरूद्ध अवैध जनावराची वाहतुक व शासकीय कामामध्ये अडथळा निर्माण केला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस उपनिरीक्षक सचीन साहेबराव डायलकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोस्टे देवलापार येथे नमुद आरोपीविंरूध्द कलम ३५३,३३६,४२९,३४ भादवी सहकलम ११(१)(डी)(एफ)(एम) प्राण्याचा छळ प्रतीबंधात्मक अधिनीयम कलम ५ (अ),९ महा.संरक्षण कलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयामधील दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आले असुन तपास सपोनी श्री बोरकुटे पो स्टे देवलापार मो क्र ९५४५६६७२२३ हे करीत आहे.

## नोकरीचे आमिष दाखवुन फसवणुक

**पोलीस स्टेशन केळवद** :— अंतर्गत मौजा खुरजगाव ०८ उत्तर, यांतील फिर्यादी नामे— सतिश प्रकाश आडे वय ३० वर्ष खुरजगाव ता.सावनेर यास दिनांक २८.१२.२०२१ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण येथे वेस्टन कोलफिल्ड लि.किंवा स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये नोकरी लावून देण्याचे आमिष देवुन फिर्यादी व त्यांची पत्नी यांना १० लाख रु. मागणी करुन नोकरी संदर्भात त्यांना २२२०००९ मुलाखतीचे बोगस मेल पाठवुन व नेमणुकीबाबत बोगस अपॉईमेंट लेटर देवुन फिर्यादी व त्यांची पत्नी यांना दिल्ली आणि औरंगाबाद महाराष्ट्र येथील एस.बी.आय बँक कार्यालयात बोलावुन त्यांचे कडुन वेळोवेळी पूर्वनियोजित कटातुन रक्कम मागणी करून फिर्यादी यांचे पत्नीला नोकरी दिली नाही व फिर्यादी यांचे घेतलेल्या रक्कमेपैकी **५,८५,०००/रु** परत न करता अपहार करुन फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले. या व्यतिरिक्त बरेच नागरिकांची फसवणुक केल्याचे दिसून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोस्टे केळवद येथे **आरोपी नामे—१) श्रीमती.शिल्पा राजीव पालपर्थी २)अमित मारोती कोव्हे ३)रमेश नथ्थुजी कामोने तिन्ही रा.नागपुर** यांचेविरूध्द कलम ४२०,४६७,४६८,४७१,१२० (ब)भादवि चा गुन्हा नोंद असुन तपासात आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री नासरे मो.न. ९९२३१३१५०७ हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर